दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला यांचे न्यायालयात
नियमित दिवाणी दावा क्र. ५९/२०२२
निशाणी ३६ लगत आदेश
(महादेव विरुध्द वसंत व इतर)

प्रस्तुतचा अर्ज वादींनी मयत प्रतिवादी क्र. २६ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. वादींच्या कथनानुसार, सदरचा दावा वादींनी प्रतिवादी विरुध्द सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. दाव्याचे काम चालू असताना प्रतिवादी क्र. २६ कुंडलिक नारायण जाधव हे दि. २२.०२.२०२२ रोजी मयत झाले आहेत. मयत प्रतिवादी यांना पत्नी भामाबाई , मुलगा नामदेव व मुलगी सुमन असे वारस आहेत. सबब, प्रतिवादी क्र. २६ चे नावापुढे ''मयत'' असे लिहून वरीलप्रमाणे वारस २६अ, २६ब व २६क यांना दावा हेडींगमध्ये सामील करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

०३. सदर अर्जावरती प्रतिवादी क्र. १ ते ५ तर्फे म्हणणे देण्यात आले आहे. प्रतिवादींचे कथन की, अर्जात नमुद मजकुर खोटा आहे व मान्य नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०४. सदर अर्जावरती प्रतिवादी क्र. ९ ते ११ तर्फे म्हणणे देण्यात आले आहे. प्रतिवादींचे कथन की, अर्जात कोणतेही ठोस कारण नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०५. अभिलेख पाहिले असता असे दिसून येते की, वादीने सदरचा दावा हा सरस

निरस मानाने वाटप होवून पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केला आहे. वादीतर्फे मयत प्रतिवादी क्र. २६ चा मृत्यूचा दाखला नि. ३१/१ वरती दाखल करण्यात आला आहे. तसेच वादीने नि. ३७ वरती त्याचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यामुळे साहजीकच प्रतिवादी क्र. २६ हे मयत झाल्यानंतर वारसा हक्काने त्यांचे वाद मिळकतीमधील हक्क त्यांच्या वारसाकडे स्थलांतरीत होतात. प्रस्तुत दावा हा वाटप होवून मिळणेसाठी असल्यामुळे निश्चितपणे मयत वादीच्या वारसांना त्यांची बाजू मांडण्याची व बचावाची संधी देणे गरजेचे वाटते. त्याचवेळी जर दाव्यामध्ये मयत प्रतिवादीचे वारस पक्षकार नसल्यास त्याची दाव्यास बाधा पोहचू शकते. वरील सर्व बाबींचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

आदेश

१. वादीचा अर्ज खर्च रु. ५००/– दंड शासन नावे न्यायालयात जमा करण्याचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी वरीलप्रमाणे खर्चाची रक्कम शासन नावे जमा केलेस, वादींना मयत प्रतिवादी क्र. २६ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येते.

SANJAY MOTIRAM GHUGE
Digitally signed by SANJAY MOTIRAM GHUGE
Date: 2024.03.16 10:54:00 +0530

सांगोला (श्री. संजय मो. घुगे)

दिनांक – १५/०३/२०२४. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला.